**फॉर्म क्र. आरएससी-३**

*(राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (कंपनीचे भाग भांडवल घटवण्यासाठी प्रक्रिया) अधिनियम, २०१६ च्या नियम ३ (१) (३) च्या अनुरोधाने)*

**राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाच्या समक्ष**

**सीपी क्र. ३२७/एमबी/सी-४/२०२१**

कंपनी कायदा, २०१३ च्या प्रकरणामध्ये

आणि

कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद ६६ आणि ५२ आणि त्या अंतर्भूत नियमांच्या प्रकरणामध्ये

आणि

आयडीबीआय बँक लिमिटेडचे भाग-भांडवल घटवण्याच्या प्रकरणामध्ये

**आयडीबीआय बँक लिमिटेड (''बँक'') (सीआयएन: एल६५१९०एमएच२००४जीओआय१४८८३८)** कंपनी कायदा, १९५६ च्या तरतूदींतर्गत विधीस्थापित कंपनी ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय आयडीबीआय टॉवर, डब्ल्यूटीसी कॉम्प्लेक्स, कफ परेड, मुंबई - ४००००५, महाराष्ट्र राज्य येथे आहे ) ... विनंती अर्जदार कंपनी

**बँकेच्या ग्राहकांना सूचना**

राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (कंपनीचे भाग भांडवल घटवण्यासाठी प्रक्रिया) अधिनियम, २०१६ च्या नियम ३ (१) (३) च्या अनुरोधाने **आणि राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (एनसीएलटी) मुंबई खंडपीठाद्वारे सीपी क्र. ३२७/एमबी/सी-४/२०२१ मध्ये १२ ऑक्टोबर, २०२२ दिनांकित निर्देशांनुसार,** आयडीबीआय बँक लि. (''बँक'') **३१ ऑगस्ट, २०२१ रोजी अनुसार** बँकेचे ग्राहक असलेल्यांना याद्वारे सूचना देत आहे की, दिनांक ०१ एप्रिल, २०२१ या तारखेपर्यंत असलेला बँकेचा रु. ४५३९६,१८,३६,२५१ (रुपये पंचेचाळीस हजार तीनशे शहाण्णव कोटी अठरा लाख छत्तीस हजार दोनशे एकावन्न मात्र) चा संचयित तोटा सदर तारखेला बँकेच्या सिक्युरीटीज प्रिमियम खात्यामध्ये जमा असलेल्या रु. ५०७१९,७४,८१,७५२ (रुपये पन्नास हजार सातशे एकोणीस कोटी चौऱ्याहत्तर लाख एक्याऐंशी हजार सातशे बावन्न मात्र) च्या समक्ष समायोजित करण्याकरीता बँकेच्या भाग-भांडवलाची घट (रिडक्शन) करण्याच्या प्रस्तावाला पुष्टी मिळण्याकरीता, दिनांक ११ सप्टेंबर, २०२१ रोजी बँकेने एनसीएलटी, मुंबई खंडपीठात याचिका सादर केली होती.

भाग-भांडवलाची घट अर्थात रिडक्शन हा बँकेच्या आर्थिक परीस्थितीचे सत्य आणि उचित स्वरुप प्रस्तुत करण्याकरीता बँकेजवळ उपलब्ध असलेला अत्यंत व्यावहारीक व आर्थिकदृष्ट्या कार्यक्षम पर्याय आहे. तसेच उपरोक्त भार-पुनर्रचनेचा (rearrangement of liabilities) म्हणजेच संचयित तोट्यास बँकेच्या सिक्युरीटीज प्रीमियम खात्यात जमा असलेल्या रकमेच्या समक्ष समायोजित करणे, या गोष्टीचा बँकेच्या बॅलन्ससीट (ताळेबंद) वर कोणताही परिणाम असणार नाही. उपरोक्त घट अर्थात रिडक्शन याचा ग्राहक म्हणून कोणत्याही अधिकारांवर परिणाम होणार नाही, आणि त्यामुळे हा पर्याय कोणत्याही प्रकारच्या ग्राहक हितासाठी हानिकारक नाही.

सदर याचिके संदर्भात काही हरकत असल्यास, ती पत्राद्वारे तुमचे नाव आणि पत्ता किंवा तुमचा अधिकृत प्रतिनिधी असल्यास त्यांचे नाव आणि पत्याच्या तपशिलासोबत (आधारभूत दस्तावेजांसहीत) निम्नस्वाक्षरीकर्ता कंपनी सचिव यांना २२वा मजला, बोर्ड विभाग, आयडीबीआय बँक लि., आयडीबीआय टॉवर, डब्ल्यूटीसी कॉम्प्लेक्स, कफ परेड, मुंबई - ४००००५ येथे सदर सूचनेच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत पाठवण्यात यावी.

**संचालक मंडळा करिता आणि वतीने**
**आयडीबीआय बँक लिमिटेड**
**ज्योती बिजू नायर**
**कंपनी सचिव**

दिनांक: २५ ऑक्टोबर, २०२२ — **एसीएस: २०५५४**
स्थळ: मुंबई — अधिकृत स्वाक्षरीकर्ता

Navshakthi, Mumbai
October 25, 2022